क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवरील उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, गट-अ या पदावरील तात्पुरत्या पदोन्नतीबाबत...

महाराष्ट्र शासन
क्रीडा विभाग
शासन आदेश क्र. संक्रीआ-१३२६/पदो/प्र.क्र.१३/ई-(१४४६८३६)/२०२६/क्रीयुसे-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १५ जुलै, २०२६

शासन आदेश: -

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवरील जिल्हा क्रीडा अधिकारी, गट-अ (राजपत्रित) (वेतनस्तर एस-२०, रु. ५६१००-१७७५००) या पदावर कार्यरत असणाऱ्या खालील नमूद अधिकाऱ्यांना, सन २०२५-२६ च्या निवडसूचीनुसार उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, गट-अ (वेतनस्तर एस-२३, रु. ६७७००-२०८७००) या पदावर ज्येष्ठतेनुसार व गुणवत्तेनुसार खालील अटींच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव व सध्याची पदस्थापना	प्रवर्ग	पदोन्नतीनंतरची पदस्थापना
१	२	३	४
१	श्री. महादेव कसगावडे, जिल्हा क्रीडा अधिकारी, लातूर	खुला	उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, नागपूर विभाग, नागपूर
२	श्री. अविनाश पुंड, जिल्हा क्रीडा अधिकारी, चंद्रपूर	खुला	उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, अमरावती विभाग, अमरावती
३	श्री. मिलिंद दिक्षीत, सहायक संचालक, मुख्यालय, पुणे	इमाव	उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर

२. उपरोक्त सर्व अधिकाऱ्यांना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे :-

i. मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत सा.प्र.वि./१६ व कार्यासनाच्या दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचनांनुसार सदर पदोन्नती देण्यात येत आहे. दि.०७ मे,२०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

ii. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीचा परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमीतपणाचा कोणताही हक्क मिळणार नाही.

iii. उपरोक्त सर्व अधिकाऱ्यांनी उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, गट-अ पदावरील पदोन्नती नाकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शा.नि. क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/कार्यासन-१२, दि. १२.०९.२०१६ व सामान्य प्रशासन विभाग, शा.नि. क्र. एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यार १२. दिनांक ०१.०८.२०१९ मधील तरतूदीनुसार संबंधित अधिकाऱ्याचे नांव सन २०२५-२६ च्या निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल आणि पुढील दोन वर्षी (सन २०२६-२७ व २०२७-२८) होणाऱ्या निवडसूचीमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीत (२०२८-२९) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा,गट-अ पदावरील पदोन्नतीसाठी त्यांचा विचार करण्यात येईल.

iii. उपरोक्त अधिकाऱ्यांच्या विरूद्ध, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ८ व १० खाली विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित/न्यायालयीन प्रकरण प्रलंबीत नसल्याच्या अटीच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे. तथापि, उपरोक्त अधिकाऱ्यांच्या विरूद्ध या शासन निर्णयाच्या दिनांकास विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरण दाखल असल्यास त्यांच्याबाबतीत हे आदेश आपोआप रद्द होतील.

iv. उपरोक्त सर्व अधिकाऱ्यांनी पदोन्नती आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत पदोन्नतीच्या पदावर रुजू व्हावे अन्यथा सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि.१४.०७.२०२१ नुसार त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी अकार्यदिन म्हणून गणला जाईल. तसेच त्यांच्या विरुद्ध सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२३.१२.२०१६ मधील तरतूदीनुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल.

३. उपरोक्त सर्व अधिकाऱ्यांनी पदोन्नती आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत पदोन्नतीच्या पदावर रूजू व्हावे व संबंधित अधिकारी रूजू झाल्याचा दिनांक आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांनी शासनास कळवावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०७१५११५११०९८७४२ असा आहे. हा शासन आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ABASAHEB ATMARAM KAWALE
Date: 2026.07.15 11:52:43 +05'30'

(आबासाहेब कवळे)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१.मा.राज्यपाल यांचे खाजगी सचिव.
२.मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३.मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे सचिव
४.मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे सचिव
५.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
६.आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७.सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा (संचालनालयामार्फत)
८.सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
९.सर्व संबंधित अधिकारी (संचालनालयामार्फत)
१०.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), माराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर.
११. महालेखापाल (लेखा परीक्षा), माराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर.
१२.जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/अमरावती/लातूर.
१३.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१४.निवड नस्ती (क्रीयुसे-२).